महाराष्ट्र शासन

# अधिष्ठाता यांचे कार्यालय

## शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव जामोद

## ग्रामिण रुग्णालय परिसर, जळगांव जामोद जिल्हा-बुलढाणा

Email- gacbuldhana@gmail.com Tel - ०७२६६ २२४२६८


जा.क्र.शाआमजजा/भांडार/उपहारगृह/२०२६/ ९४२ दिनांक.१५/०७/२०२६

प्रति
प्रसिध्दीसाठी
------------
--------------

विषय :- शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय, जळगांव जामोद या संस्थेकरीता उपहार गृह-भोजनालय आणी रुग्णांना आहार पुरवठा करण्याकरीता २ लिफाफा पध्दतीने दरपत्रके मागविणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय, जळगांव जामोद हि संस्था नव्याने निर्माण झालेली असुन या महाविद्यालय व रुग्णालयतील अधीकारी/कर्मचारी/विद्यार्थी/रुग्ण तसेच रुग्णांसोबतचे नातेवाईक यांचे करीता उपहार गृह-भोजनालय चालविणे तसेच रुग्णालयामध्ये उपचाराकरीता भरती होणाऱ्या रुग्णांना आहार सेवा पुरवविण्याकरीता पुरवठादाराची निवड करुन त्यांचे सोबत दरकरार करावयाचा आहे.

याकरीता सोबत जोडलेली यादी व तपशीलाप्रमाणे आपण आपले विषयांकित बाबीचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये विहित कालावधीत खालील नमूद अटी व शर्ती यांच्या अधिन राहून सादर करावे.

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | दरपत्रक सादर करण्याचा कालावधी | दिनांक -१६.०७.२०२६ ते २८.०७.२०२६ (या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व वेळेत, शासकीय व स्थानिक सुटटीचे दिवस वगळून<br>( सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ) |
| २ | दरपत्रक पुर्व बैठक दिनांक व वेळ | दिनांक- २०.०७.२०२६ रोजी सकाळी.११.०० वाजता |
| ३ | दरपत्रक उघ्दडण्याचा दिनांक व वेळ | दिनांक- २९.०७.२०२६ रोजी सकाळी.११.०० वाजता |
| ४ | दरत्रक सादर करण्याचे व उघडण्याचे ठिकाण | अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय परिसर, जळगांव जामोद जिल्हा बुलढाणा |

## अ

## बंधनकारक सुचना

१. दिनांक-२८.०७.२०२६ रोजी सांय ५.०० वाजल्यानंतर प्राप्त होणा-या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रकाच्या पाकीटावर उपहार गृह-भोजनालय पुरवठा दरपत्रक असा उल्लेख करणे आवश्यक आहे.
३. दरपत्रक प्रक्रिया हि दोन लिफाफा पध्दतीची राहिल.लिफाफा क्र.१ मध्ये कागदपत्रे सादर करावीत तसेच क्र.२ मध्ये दर सादर करावेत. लिफाफा क्रमांक १ मध्ये पात्र ठरल्यानंतरच लिफाफा २ उघडण्यात येईल.
४. दरपत्रकात कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा ओव्हररायटींग असता कामा नये. दरपत्रकामध्ये आवश्यक तेथे दिनांक व ठिकाण नमुद करावे.

५. पुरवठादाराने GST ची नोंदणी करणे आवश्यक राहील. तसेच दरपत्रके संस्थेची नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक सुचनेनुसार विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील.

६. दरपत्रक सादर करणा-या दरपत्रकधारकाचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेणा-या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये, तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधिक दरपत्रके नाकारण्यात येतील. याकरीता सोबत जोडण्यात आलेली हमीपत्र दरपत्रकधारकास सादर करणे बंधनकारक राहील.
**(हमी पत्र विहीत नमुन्यात सादर करावे)**

७. दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक सादर केलेल्या दरपत्रक धारकाचा दरपत्रक प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्सक्ष संबध नसावा. तसे आढळल्यास दरपत्रक नाकारण्यात येतील.

८. **दरपत्रकासोबत GST नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, आधार कार्ड छायांकित प्रत सादर करणे आवश्यक राहील.**

९. देयकाच्या रकमेतुन शासन नियमातील तरतुदीनुसार GST/ Income Tax कपात करण्यात येईल. सदर टॅक्स मधुन सुट अनुज्ञेय असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

१०. दरपत्रके उघडण्याच्या वेळी कंपनीच्या एका प्रतिनिधीस स्वखर्चाने हजर राहण्याची मुभा राहील.

११. दरपत्रकानुसार मंजुर करण्यात आलेल्या दराव्यतिरिक्त इतर कोणतेही दर देय होणार नाहीत.

१२. शा.निर्णन उद्योग व उर्जा विभाग दि.०१.१२.२०१६ मध्ये नमूद केल्यानुसार पुरवठादाराच्या बाबतीत खरेदीच्या कोणत्याही टप्पावर अनियमितता/गैरप्रकार/नैतिक अध:पतन इतरही बाबी निदर्शनास आल्यास त्याबाबत शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. आपल्या देयकांची रक्कम ऑनलाईन पध्दतीने त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी पॅनकार्ड झेरॉक्स प्रत व रद्द केलेला धनादेश इ. देणे आवश्यक राहील. त्याशिवाय देयकाची रक्कम अदा करणे शक्य होणार नाही.

१४. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव जामोद जिल्हा बुलढाणा हे सदर दर पत्रक स्विकारणे, रद्दकरणे, यशस्वी दरपत्रक स्विकारणाच्या पूर्वी किंवा यशस्वी दरपत्रक स्विकारण्यात आल्यानंतर देखिल कोणत्याही वेळी रदद करण्याचे अधिकार तसेच खरेदी प्रक्रियेच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार राखुन ठेवत आहे.

१५. दरपत्रक मंजुर केल्यानंतर सदर आवश्यक त्या साहित्य व सामुग्रीचा पुरवठा संबंधित पुरवठा दार यांना स्वखर्चाने करणे आवश्यक राहिल.

१६ दरपत्रक पुर्व बैठकीच्या दिवशी संबंधीत पुरवठादार यांनी स्वत: किंवा त्यांचे प्रतिनीधी यांना स्वखर्चाने उपस्थीत राहण्याबाबत सुचित करावे. सदर बैठकीस उपस्थीत न राहिल्यास सदर बैठकीच्या नंतर कोणत्याही पुरवठादारांची हरकत किंवा सुचना विचारात घेतली जाणार नाही.

(स्वाक्षरीत)

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगांव जामोद जिल्हा- बुलढाणा

# ब

## लिफाफा क्रमांक.१ मध्ये सादर करावयाची कागदपत्रे

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १ | Annexure - B |
| २ | अन्न व औषध प्रशासन विभागांचे नोंदणीकृत परवानाधारक असल्याचे कागदपत्रे |
| ३ | GST Registration certificate |
| ४ | Shop and establishment/company registration certificate |
| ५ | मागणी ३ वर्षाचे सनदी लेखापाल यांनी प्रमाणीत केलेल्या लेख्यांची प्रत (Balance sheet) |
| ६ | शासकीय/निमशासकीय/खाजगी संस्थेमध्ये भोजनालय संबंधी अनुभव प्रमाणपत्र, तसेच ज्या ठिकाणी काम केलेले आहे त्या ठिकाणचा पुर्ण पत्ता, संस्थेचे नांव नमुद करावे. |
| ७ | भोजनालय चालविण्यासाठी अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर देणे बंधनकारक राहिल. |
| ८ | सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पाणी पिण्यास/वापरण्यास योग्य असल्याबाबतचा पाणी नमुन्याचा सुक्ष्मजीवीय अहवाल पुरवठादार यांनी सादर करणे बंधनकारक राहिल. |
| ९ | हमीपत्र १ व हमीपत्र २ विहित नमुन्यात भरुन देण्यात यावे. |
| १० | काळया यादीत न टाकल्याबाबत/बंदी न घातल्यायाबाबत निवदाकाराने करावयाच्या घोषणेचा नमुना |
| ११ | Declaration by the Firm/Agency |
| १२ | Cancelled cheque |
| १३ | Adhar card |
| १४ | Pan card |

( स्वाक्षरीत )

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगांव जामोद जिल्हा- बुलढाणा

# क

## रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर वरील अटी व शर्ती

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १. | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय या दोन्ही संस्थांचे उपहार गृह-भोजनालय स्वतंत्र असेल. |
| २ | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय, जळगांव जामोद अधीनस्त उपहार गृह-भोजनालय चालविण्याचा करार प्रथमत: ११ महिने कालावधीचा असेल. कराराच्या दिनांकापासुन पहिल्या ११ महिन्याचा कालावधीत सेवा, खाद्यपदार्थाचा दर्जा, चव, करारातील स्वीकारलेली किंमत व त्यानुसार प्रत्यक्षात पुरवठा केलेल्या खाद्यपदार्थांचा परिणाम आणी स्वच्छता तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवा व वर्तवणुक यांच मुल्यमापन करुन पुढील ११ महिन्यांच्या कालावधीत करार वाढविण्यात येईल. |
| ३ | दरपत्रक सादर करणाऱ्या पुरवठादार यांचे कडे अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत नोंदणीकृत परवानाधारक असणे बंधनकारक आहे. |
| ४ | पात्र पुरवठादार यांना या संस्थेकडे रुपये २५,०००/- अनामत रक्कम भरणे बंधनकारक आहे. पुरवठादार यांचा करार संपुष्टात आल्यानंतर कोणतेही शासकीय देणे, थकबाकी किंवा नुकसान भरपाई या सारखी वसुल या रकमेतुन करण्यात येईल. करार कालावधीत ठेकेदाराचा अनामत रक्कमवर कोणताही अधीकार असणार नाही. |
| ५ | उपहार गृह-भोजनालय करीता उपलब्ध करुन दिलेली जागा शासन नियमानुसार विनामुल्य वापरता येईल. |
| ६ | पात्र ठेकेदार यांना विजेचे मासीक देयकाचा भरणा वेळेत करणे बंधनकारक राहिल तसेच सदर देयक भरल्या नंतर त्यांची एक प्रत कार्यालयाकडे जमा करावी लागेल. |
| ७ | सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे पाणी पिण्यास/वापरण्यास योग्य असल्याबाबतचा पाणी नमुन्याचा सुक्ष्मजीवीय अहवाल पुरवठादार यांनी सादर करणे बंधनकारक राहिल. |
| ८ | स्वयंपाकासाठी लागणारे साहित्य तसेच उपहारगृह-भोजनालय करीता लागणारे सर्व साहित्य इत्यादींची व्यवस्था पुरवठादार यांना स्वत: करावी लागेल. |
| ९ | उपहार गृह-भोजनालय सकाळी ७.०० ते रात्री ९.०० पर्यंत सुरु राहिल. |
| १० | उपहार गृह-भोजनालय चालविण्यासाठी विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये १००/- च्या स्टँप पेपरवर लिखीत स्वरुपात देणे बंधनकारक राहील. |
| ११ | उपहार गृह-भोजनालय ताबा स्वीकारतेवेळी भोजनालयामध्ये आवश्यक असणारी किरकोळ दुरुस्ती पुरवठादार यांना करावी लागेल, तसेच आवश्यक फर्निचर स्वत: उपलब्ध करावे लागेल. |
| १२ | सुटीच्या दिवशी व अन्य प्रसंगी महाविद्यालयाच्या सहमती शीवाय भोजनालय बंद ठेवता येणार नाही. |
| १३ | ज्या ठिकाणी अध्यापक/अधीकारी/कर्मचारी यांची बसण्याची व्यवस्था असेल तेथे खाद्य पदार्थांची दरसुची लावणे बंधनकारक राहिल. |
| १४ | उपहार गृह-भोजनालय मधील जेवन, चहा, नाश्ता इत्यादी बाबतचे दर सोबत जोडलेल्या यादीमध्ये नमुद करावे. तसेच रुग्णांना आहार सेवा बाबतचे दर सुध्दा सादर करावे. |
| १५ | या संस्थेच्या समितीकडुन कोणत्याही क्षणी उपहार गृह-भोजनालयातील खाद्य पदार्थांच्या दर्जाची तपासणी करु शकतील. खाद्य पदार्थांचा आवश्यक तो दर्जा न आढळल्यास ठेकेदारासोबत झालेला करार तात्काळ रद्द करण्यात येईल. |
| १६ | उपहार गृह-भोजनालय मध्ये मांसाहारी प्रकारचे पदार्थं बनविण्यासस सक्त मनाई आहे, मादक व तंबाखुजन्य पदार्थ वितरीत करता येणार नाही. |
| १७ | उपहार गृह-भोजनालय तसेच स्वयंपाक गृहामध्ये स्वच्छता राखणे बंधनकारक आहे. कचरा व्यवस्थापन (ओला व सुका कचरस) नगर परीषद यांचे नियमानुसार करण्यात यावे. |

१८ उपहार गृह-भोजनालय मध्ये १४ वर्षाखालील वयाच्या मुलांचा/मुलींचा (बाल कामगार) कामासाठी वापरता येणार नाही.

१९ उपहार गृह-भोजनालयातील स्वयंपाकी, वेटर, साफसफाई करणारे मनुष्यबळ स्वच्छ गणवेशात असावेत. त्यांची वर्तवणुक नम्र असावी. सदर कर्मचाऱ्यांची वैद्यकीय चाचणी घेण्यात यावी. मनुष्यबळाच्या वैद्यकीय तपासणीचे कागदपत्रे कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. संसर्गजन्य आजाराने बाधीत व्यक्ती उपहार गृह-भोजनालयात काम करणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२० उपहार गृह-भोजनालयाचा करार संबंधीत पुरवठादार यांचे सोबत केला असल्याने परस्पर अन्य कंत्राटदारास कंत्राट देता येणार नाही किंवा करार करता येणार नाही.

२१ करारातील अटी व शर्ती नुसारच अन्न व औषध प्रशासनचे नियमानुसार परवाना प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे लागेल.

२२ करारातील अटी व शर्तींचा भंग झाल्यास अथवा भोजन योग्य रीतीने न पुरविल्यास आपणावर दंड आकारण्याचे तथा आपली सुरक्षीत ठेव जप्त करण्याचे तसेच आपला करार दद्य करण्याचे अधीकारी अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव जामोद यांना राहतील.

२३ आपण पुरविलेले भोजन भेसळयुक्त आहे असे निदर्शनास आल्यास व तसे सिध्द झाल्यास भेसळ प्रतिबंधक कायदा व अन्न व औषध प्रशासन विभागांतर्गत होणाऱ्या कारवाईस संबंधीत पुरवठादार जबाबदार राहिल.

२४ सदर उपहार गृह-भोजनालयाचा वापर कोणत्याही व्यापारी स्वरुपाच्या प्रयोजनासाठी करता येणार नाही.

२५ दरपत्रक सादर करतेवेळी पुरवठादारकडे नगर परीषद यांचे आरोग्य विषयक ना-हरकत प्रमाणपत्र नसल्यास उपहार गृह-भोजनालय कार्यान्वीत झाल्यापासुन ०३ महिने किंवा त्यापुर्वी नगर परीषद यांचे कडुन सदर प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहिल अन्यथा पुरवठादार यांचे सोबत करण्यात आलेला करार कोणतीही पुर्व सुचना न देता रद्य करण्यात येईल व तदनंतर पुरवठादाराचे काही आर्थीक नूकसान झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.

२६ प्राप्त दरपत्रकानुसार अल्पोपहार, भोजनव इतर खाद्यपदार्थ यांचे दर अंतीमत: निश्चीत करण्याचे अधीकार समितीस राहतील. उपहार गृह-भोजनालयीतील खाद्यपदार्थांचे दर निश्चीत झाल्यांनतरच समितीच्या मंजुरी शीवाय खाद्यपदार्थांचे दर कोणत्याही कारणास्तव वाढवता येणार नाहीत.

२७ दरपत्रक धारकांनी केवळ एकच दरपत्रक सादर करावे. दरपत्रक धारकांचा दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेतलेल्या इतर संस्थासोबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबंध व सहभाग नसावा. तसेच आढल्यास दरपत्रक नाकारण्यात येईल.

२८ दरपत्रक सादर करणाऱ्या दरपत्रक धारकांचा किंवा संस्थेचा दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेण्याऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये तसे आढळल्यास दोन्ही किंवा अधीक दरपत्रके नाकरण्यात येतील.

२९ पुरवठादार यांचे सोबत केलेला करार रद्य करणे, पुढे सुरु ठेवणे याबाबत निर्णय घेण्याचा अधीकार अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव जामोद हे राखुन ठेवत आहेत.

३० पुरवठादार यांना केलेला करार रद्य करावायाचा असल्यास किमान एक महिना आधी त्यांची लेखी पुर्वसुचना कार्यालयास द्यावी लागेल. तसेच या कार्यालयाकडुन काही तांत्रीक किंवा प्रशासकीय बाबींमुळे सदर करार रद्य करावयाचा असल्यास एक महिना आधी लेखी पुर्वसुचना संबंधीत पुरवठादार यांना देण्यात येईल. मात्र पुरवठादार यांचे कडुन अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास किंवा काही बेजाबदार वर्तवणुक आढळुन आल्यास करार या कार्यालयाचे समितीच्या तपासणीनंतर तात्काळ रद्य करण्याचा हक्क अधीष्ठाता राहुन ठेवत आहेत.

३१ संस्थेतील कोणत्याही व्यक्तीस उधारीवर कोणत्याही बाबींचा पुरवठा करण्यात आल्यास त्याबाबची वसुलीची जबाबदारी पुरवठादाची राहिल, याबाबत संस्था कोणतीही जबाबदारी घेणार नाही.

३२ सदर उपहार गृह-भोजनालय फक्त शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालय, जळगांव जामोद येथील अध्यापक/अधीकारी/कर्मचारी/विद्यार्थी/रुग्ण आणी रुग्णांसोबत असलेली व्यक्ती यांचे करीता असेल. या उपहार गृह-भोजनालयातील सुविधांचा उपयोग बाहेरील अन्य व्यक्तीस घेता येणार नाही.

३३ दरपत्रक सादर करताना जीएसटी क्रमांक असलेल्या लेटर हेड किंवा रबरी शीक्का व सही असलेल्या लेटर वर सादर करावे.

३४ वरील क्रमांक १ ते ३४ अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल करण्याचा तसेच आवश्यकतेनुसार कार्यारंभ आदेश निर्गमीत करतेवेळी अटी व शर्ती मध्ये वाढ करण्याचा अधीकार अधीष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव जामोद हे राखुन ठेवत आहेत.

सुचना - दरपत्रक स्वीकारणे किंवा नाकरणे किंवा दरपत्रक प्रक्रिया रद्द करणे यासंबंधीचा संपुर्ण अधीकार अधीष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे, त्याप्रमाणे कोणत्याही प्रकरणावर अधीष्ठाता यांचा निर्णय अंतिम राहील.

( स्वाक्षरीत )

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगांव जामोद जिल्हा- बुलढाणा

# अ-उपहार गृह-भोजनालय करीता
## खाद्यपदार्थांचे नांव

| अ.क्र. | पदार्थांचे नांव | प्रस्तावीत दर रुपये |
|---|---|---|
| १ | जेवन साधे, ४ चपाती, २ भाज्या, (रस्सा व सुकीभाजी), १ वाटी भात, १ वाटी दाळ, लोणचे किंवा चटणी, सलाद | |
| २ | जेवन स्पेशल, ४ चपाती, २ भाज्या, (रस्सा व सुकीभाजी), १ वाटी जीरा राईस किंवा पुलाव, १ वाटी दाळ, लोणचे किंवा चटणी, सलाद, १ गोड पदार्थ | |
| ३ | जादा चपाती (प्रती चपाती) | |
| ४ | इडली चटणी (०२ नग) | |
| ५ | मिसळ पाव | |
| ६ | बटाटा वडा रस्सा (०२ नग) | |
| ७ | बटाटा वडा चटणी (०२ नग) | |
| ८ | कांदा भजी | |
| ९ | कांदा पोहे | |
| १० | उपमा | |
| ११ | शीरा | |
| १२ | चहा साधा (फुल) | |
| १३ | चहा साधा (कटींग) | |
| १४ | चहा स्पेशल (फुल) | |
| १५ | चहा स्पेशल, हर्बल/ब्लॅक/लेमन | |
| १६ | दुध (फुल ग्लास) | |
| १७ | दुध (हाफाग्लास) | |
| १८ | बेड बटर | |
| १९ | फ्रुट प्लेट | |
| २० | साबुदाना वडा (गुरुवार) | |
| २१ | साबुदाना उसळ/खीचडी (गुरुवार) | |
| २२ | ताक | |
| २३ | सिलबंद पिण्याचे पाणी | |

सुचना :- वरील यादी व्यतीरीक्त बिस्कीट,ब्रेड,केक, खारी तसेच इतर तत्सम पदार्थांचे दर हे त्या त्या वस्तुंच्या कंपनीचे प्रचलीत दरानुसारच राहतील.

( स्वाक्षरीत )

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगांव जामोद जिल्हा- बुलढाणा

## ब – रुग्णांकरीता आहार सेवा वेळापत्रक

| अ.क्र. | वेळ | मात्रा | परिमाण | प्रति रुग्ण/व्यक्ती दर (जीएसटी सह) |
|---|---|---|---|---|
| १ | सकाळी ७.०० वाजता | चहा | शासनाने ठरवुन दिलेल्या सुधारीत आहाराचे प्रमाण नुसार दाखल होणाऱ्या आंतरुग्णांना आहार सेवा पुरविण्यात यावी. | |
| २ | सकाळी ८.०० वाजता | नाश्ता | | |
| ३ | दुपारी १२.०० वाजता जेवण | डाळ,भात,चपाती,भाजी | | |
| ४ | दुपारी ४.०० वाजता | चहा | | |
| ५ | रात्री ७.१५ वाजता जेवण | डाळ,भात,चपाती,भाजी | | |

**महत्त्वाची सुचना :–** वरील आहर वेळापत्रकामध्ये रुग्णांना द्यावयाचा नाश्ता, जेवण आणी विविध फळे इत्यादी बाबत दर नमुद करण्यासाठी काही शंका किंवा अडचण असल्यास या कार्यालयामध्ये दिनांक. २०.०७.२०२६ रोजी सकाळी.११.०० वाजता  दरपत्रक पुर्व बैठक आयोजीत करण्यात आली आहे. ज्या पुरवठादारांना दरपत्रक सादर करावयाचे आहे त्यांनी सदर बैठकीस उपस्थीत राहुन शंकेचे निरसन करुन घ्यावे.

( स्वाक्षरीत )

अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,
जळगांव जामोद जिल्हा- बुलढाणा

# Annexure – B

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव जामोद

| अ.क्र. | तपशिल | आवश्यक माहिती वा प्रमाणपत्रे जोडण्यात आलेली आहेत किंवा कसे |
|---|---|---|
| १ | पुरवठादाराचे नाव | |
| २ | कंपनीचा पत्ता,दुरध्वनी ई-मेल आयडी सहित | |
| ३ | कंपनीचा नोंदणी क्रमांक ( Registration No.) | |
| ४ | GST No. | |
| ५ | PAN No. | |
| ६ | शासनाचे /इतर कर | |
| ७ | सदर वस्तुंचा पुरवठा इतर शासकीय/निमशासकीय कार्यालयास केला असल्यास अशा कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्र. अथवा पुरवठा आदेशांची छायांकित प्रत | |
| ८ | हमी पत्र | |
| ९ | इतर अटी व शर्ती असल्यास | |

स्थळ :
दिनांक : पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

## हमीपत्र -१ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव जामोद

मी,............................ लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत उपहार गृह-भोजनालय आणी रुग्णांना आहार पुरवठा करीता राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझे किंवा माझ्या संस्थेचे खरेदी प्राधिकारी/खरेदी समिती यांचे सोबत कोणत्याही प्रकारचे हितसंबध/संघर्ष नाहीत तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

.......................................................................................................................

## हमीपत्र-२ ( Undertaking )

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव जामोद

मी ...............................लेखी हमी देत आहे की, आपल्या कार्यालयामार्फत उपहार गृह-भोजनालय आणी रुग्णांना आहार पुरवठा राबविण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी/माझी संस्था केवळ एकच दरपत्रक सादर करीत आहे. त्याचप्रमाणे दरपत्रक प्रक्रियेत भाग घेण्या-या अन्य संस्थांसोबत माझा/माझ्या संस्थेचा कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष संबध वा सहभाग नाही तसे आढळून आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे वा अपात्र समजण्यात यावे.

स्थळ :
दिनांक :

पुरवठादाराचा अधिकृत स्वाक्षरी व शिक्कांसहित

## Declaration by the Firm/Agency

This is to certify that I/We before signing this Quotation have read and fully understood all the terms and conditions contained herein and undertake myself/ourselves to abide by them.

Date:

(Signature of Firm with seal)

Name –

Seal –

Address –

# काळया यादीत न टाकण्याबाबत/बंदी न घातल्याबते घोषणा पत्र

प्रति,

अधिष्ठाता,

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव जामोद

मी,---------------------------------------- लेखी हमी देत आहे की, आपल्या संस्थेमार्फत उपहार गृह-भोजनालय आणी रुग्णांना आहार पुरवठा राबिवण्यात येत असलेल्या दरपत्रक प्रक्रियेत मी भाग घेत असून माझ्या संस्थेला काळया यादीत टाकण्यात आलेले नाही अथवा माझ्या संस्थेवर कोणत्याही प्रकारची बंदी घालण्यात आलेली नाही. तसे आढळुन आल्यास माझे दरपत्रक नाकारण्यात यावे व अपात्र करण्यात यावे.

स्थळ :

दिनांक : पुरवठादाराचा अधिकृत सहि व शिक्का